गांवकरी
www.gavakari.net
21 Mar 2024 - Page 9

साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वाघ स्कूलचा चित्रकला परीक्षेत १०० टक्के निकाल



**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ इंग्लिश स्कूल, सरस्वतीनगर येथील एलिमेंटरी ग्रेड व इंटरमिजिएट ग्रेड या चित्रकला परीक्षेत स्कूलचा १००% निकाल लागलेला आहे. एलिमेंटरी ग्रेड परीक्षेस ५८ विद्यार्थी तर इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेस ५५ असे एकूण ११३ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. या निकालाने स्कूलने निकालाची परंपरा कायम ठेवलेली आहे. इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेस बसलेल्या १८ विद्यार्थ्यांनी 'अ' श्रेणी, ११ विद्यार्थ्यांनी 'ब' श्रेणी तसेच २६ विद्यार्थ्यांनी 'क' श्रेणी प्राप्त केली. एलिमेंटरी ग्रेड परीक्षेस बसलेल्या २१ विद्यार्थ्यांनी 'अ' श्रेणी, १६ विद्यार्थ्यांनी 'ब' श्रेणी तर २१ विद्यार्थ्यांनी 'क' श्रेणी प्राप्त केली असल्याची माहिती मुख्यध्यापिका अश्विनी पवार यांनी दिली. या दोन्ही परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवल्याबद्दल पालकांनी आनंद व्यक्त केला. विद्यार्थ्यांना कलाशिक्षक माधुरी निफाडे, प्रांजल अम्रिते व सचिन काळे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष मा. समीर बाळासाहेब वाघ, विश्वस्त मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी, समन्वयक डॉ. भूषण कर्डिले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.